विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक यांचे कार्यालय
विकास वालावलकर बंगला
रूम नं. बी/68, पहिला मजला,
कामगार नगर, कुर्ला (पूर्व)
कुर्ला (पू.) 400 024
फोन नं. 022-25220097

OFFICE OF THE DIVISIONAL
FOREST OFFICR,
Vikas Valavalkar Bonglow,
B/68, 1st floor,
Kamgar nagar, kurla (E)
Kurla €-400 024
Email Id-dfommcu@gmail.com

विषय : मौजे मार्वे स.क्र.50अ व मौजे मालवणी स.क्र. 263,
न.भू.क्र. 1601 मधील आय.एन.एस. हमला यांचे द्वारे
अतिक्रमित क्षेत्रात झालेल्या नुकसानी बाबत.
जा.क्र. वित्रअ/मुंकांसंघ/गुन्हे कक्ष-9/ 715 /सन2018-19
कुर्ला- 400 024, मुंबई दि.-2[illegible]/06/2018.

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक,
कांदळवन कक्ष,
मुंबई

संदर्भ : 1. पश्चिम मुंबई, वनक्षेत्रातील प्रथम वनगुन्हे रिपोर्ट क्र. ई/21/2018,
दि. 03/03/2018

सदर गुन्हे प्रकरणी गुन्हे एप्रिल 2016 पूर्वी घडलेला आहे. गुन्ह्याचे ठिकाणी मौजे मालवणी स.क्र. 263, न.भू.क्र. 1601 व मौजे मार्वे स.क्र. 50 अ, न.भू.क्र. 53 या अधिसुचित राखीव कांदळवन क्षेत्र हे आहे. सदर क्षेत्र हे आय.एन.एस. हमला या नावीक दलाच्या वापरातील क्षेत्राला लागून असून त्यांचेकडून अनावधानाने त्यांचे ताब्यातील क्षेत्र सलग असल्याने व हद्दीवर सीमांकन नसल्याने भराव टाकल्याने सुमारे 6 हे. क्षेत्रातील कांदळवन नष्ट झाले आहे. सदरची बाब ही दि. 03/03/2018 रोजी उघडकीस आल्याने त्याप्रमाणे प्रथम गुन्हा वृत्तांन्त क्र. ई 21/2018, दि. 03/03/2018 नोंदविण्यात आला आहे.

तदपूर्वी दि. 15/12/2016 रोजीचा पंचनामा विचारात घेता सदर क्षेत्र हे महसूल विभागाने नाविक दलाच्या वापरासाठी दिलेले क्षेत्र आहे असे समजून इतर क्षेत्रासोबतच योही क्षेत्रासह महसूल विभागाने मालवणी पोलीस स्टेशनला दिलेली पोलीस फिर्याद क्र. 28/2016, दि. 25/01/2016 अन्वये पर्यावरण संरक्षण कायद्याखाली तपास होऊन त्याप्रमाणे पोलीसांमार्फत कंत्राटदाराविरुध्द दोषारोप पत्र (दोषारोप पत्र क्र. 2883/2016, दि. 18/07/2016, बोरिवली (प.) न्यायालयात) दाखल करण्यात आले आहे. सदर बाब आज रोजी न्यायप्रविष्ट आहे.

प्रकरणी जागेवर भराव टाकला असल्याने याबाबत सरळ नुकसानीचा अंदाज शक्य होत नाही. त्यामुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज हा लगतच्या क्षेत्रात असलेल्या कांदळवनाच्या साठ्याचा अभ्यास करून खालीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

मुंबई कांदळवन संधारण घटक, पश्चिम मुंबई वनक्षेत्रातील मौजे मार्वे स.क्र. 50 अ व मौजे मालवणी सर्व्हे क्र. 263 न.भु.क्र. 1601 मधील आय.एन.एस हमला यांचे द्वारे अतिक्रमीत क्षेत्रात झालेल्या नुकसानीची अंदाजीत रक्कम काढणेकरीता सदर क्षेत्रालगत मौजे मालवणी सर्व्हे क्र. 263 न.भु.क्र. 1601 मध्ये 10 ×10 मी. चे प्रातिनिधीक स्वरुपाचे प्लॉट मोजण्यात आले. सदर प्लॉट मधील झाडांची गणना व वेढी पंचासमक्ष घेण्यात आली. सदर 5 प्लॉट मध्ये 105 झाडांची गणना करण्यात आली त्यावरुन 6 हेक्टर मध्ये 12600 झाडे असल्याचा अंदाज आहे. सोबतच्या प्रपत्रात सदर बाबतींचा उहापोह करण्यात आलेला आहे. सदर प्लॉट मधील झाडांच्या गणना व वेढीनुसार आय.एन.एस हमला ने केलेल्या अतिक्रमीत क्षेत्रातील झाडांच्या नुकसानीची किंमत 421440 /- रुपये एवढी आहे.

वरील प्रमाणे प्रकरणी वृक्षनुकसानी रु. 4,21,440/- इतकी होत आहे. याबाबत निम्नस्वाक्षरीकर्ता यांनी सदर क्षेत्रास दि. 16/05/2018 रोजी सहाय्यक वनसंरक्षक, कांदळवन संरक्षण, मुंबई व इतर वन कर्मचारी आणि आय.एन.एस. हमला चे अधिकारी यांचे समवेत भेट देवून प्रत्यक्ष पाहणी केली असून चर्चा ही केली आहे.

सदर स.क्र. सर्व्हे क्र. 263 न.भु.क्र. 1601 हे मुळ शासकीय असून महसूल विभागाकडून दि. 29/08/2008 रोजी वनविभागास हस्तांतरीत झाले आहे. दि. 18 फेब्रुवारी, 2009 च्या अधिसुचनेप्रमाणे सदर क्षेत्र हे कलम 4 प्रमाणे राखीव असून अद्याप कलम 20 प्रमाणे अंतिमत: अधिसुचित झालेले नाही.

याबाबत दि. 21/06/2018 रोजी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांच्या झालेल्या बैठकीनुसार जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याप्रमाणे कार्यवाहीच्या अनुषंगाने वरिष्ठांचे मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. असे कमांडर आय.एन.एस. हमला यांचे प्रतिनिधींनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडे झालेल्या बैठकीत सांगितले आहे. तसेच सदर क्षेत्र हे नाविक दलाच्या ताब्यात देण्यात आलेल्या क्षेत्रास सलग आहे. अतिक्रमण जाणीवपूर्वक केलेले नाही आणि याबाबत वनजनाबंद अधिकारी यांचेकडे हक्क मागणीपत्र दाखल करणेकामी मार्गदर्शन अपेक्षित केले आहे.

वरील सर्व बाबी बाबत या कार्यालयाचे मागणीप्रमाणे त्यांना लेखी अहवाल सादर करण्याच्या सुचना देण्यात आल्या आहेत.

(एस.एम. पंडितराव)
विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक

सहपत्र:- १. वृक्ष गणना प्रपत्र.
२. या कार्यालयाने कमांडींग ऑफिसर, आय.एन.एस. हमला यांना जा.क्र. DFO/MMCU/desk-offence-८/४७७/२०१-१९, date:- २६/०५/२०१८ अन्वये दिलेले पत्र.

01C

Dfommcu/Offence/Lette

मौजे मालवणी सर्व्हे क्र. 263 न.भु.क्र. 1601 मधील प्रातिनिधीक (Sample) प्लॉट मधील झाडे गणना पुढीलप्रमाणे

| SR. No. | 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|---|
| | G(cm) | G(cm) | G(cm) | G(cm) | G(cm) |
| 1 | 30 | 51 | 59 | 43 | 24 |
| 2 | 27 | 53 | 21 | 48 | 19 |
| 3 | 15 | 44 | 22 | 59 | 36 |
| 4 | 56 | 41 | 15 | 24 | 22 |
| 5 | 43 | 28 | 43 | 55 | 23 |
| 6 | 49 | 51 | 46 | 42 | 29 |
| 7 | 38 | 25 | 28 | 51 | 43 |
| 8 | 27 | 52 | 62 | 52 | 19 |
| 9 | 25 | 27 | 55 | 46 | 34 |
| 10 | 36 | 18 | 29 | 51 | 28 |
| 11 | 61 | 34 | 38 | 48 | 24 |
| 12 | 32 | 23 | 47 | 41 | 26 |
| 13 | 41 | 42 | 28 | 23 | 48 |
| 14 | 40 | 17 | 24 | 54 | 22 |
| 15 | 45 | 50 | 33 | 42 | 14 |
| 16 | 52 | 34 | 27 | 75 | 46 |
| 17 | 49 | 66 | 41 | 28 | 26 |
| 18 | 47 | 35 | 33 | 88 | 27 |
| 19 | 26 | 41 | 25 | | 24 |
| 20 | 53 | 23 | 44 | | 34 |
| 21 | | 56 | 27 | | 71 |
| 22 | | 76 | | | 58 |
| 23 | | | | | 28 |
| 24 | | | | | 40 |
| 25 | | | | | 53 |

| वेढी | ३० | ३१-४५ | ४६-६० | ६१-७५ | ७६-९० | ९१-१०५ | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| प्लॉट क्र. १ (१०×१० मी.) | ६ | ७ | ६ | १ | | | २० |
| प्लॉट क्र. २ (१०×१० मी.) | ७ | ७ | ६ | १ | १ | | २२ |
| प्लॉट क्र. ३ (१०×१० मी.) | १० | ६ | ४ | | | | २० |
| प्लॉट क्र. ४ (१०×१० मी.) | ३ | ४ | ९ | १ | १ | | १८ |
| प्लॉट क्र. ५ (१०×१० मी.) | १५ | ५ | ४ | १ | | | २५ |
| एकूण | ४१ | २९ | २९ | ४ | २ | ० | १०५ |
| झाडे संख्या प्रती १०० चौ.मी. | ८.२ | ५.८ | ५.८ | ०.८ | ०.४ | ० | २१ |
| झाडे संख्या ६ हे. | ४९२० | ३४८० | ३४८० | ४८० | २४० | ० | १२६०० |
| Form Factor | ०.००५ | ०.०१५ | ०.०३ | ०.०६६ | ०.१२२ | ०.१७६ | - |
| घन मीटर | २४.६ | ५२.२ | १०४.४ | ३१.६८ | २९.२८ | ० | २४२.२ |
| एक वेढी वर्ग कमी किंमत | ० | १४ | ६४ | १४६ | ३३३ | ५१९ | - |
| एकूण | ० | ४८७२० | २E+०५ | ७००८० | ७९९२० | ० | ४२१४४० |